**उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. २ ते ५ तर्फे वकील श्री. आर. एस. गव्हाणकर यांचे मार्फत सुरु–**

९. दाव्यातील ड व ई परिशिष्टामध्ये एकूण किती मिळकती आहेत हे मला सांगता येणार नाही. दाव्यातील ड व ई परिशिष्टातील मिळकतींचे मला वाटप करुन हवे आहे. दावा दाखल करणेपुर्वी ड व ई परिशिष्टातील दावा मिळकतींचे सातबारा उताऱ्याच्या सहीसूद नक्कला मी माझ्या विधीज्ञांना दिल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की माझ्या दाव्यामध्ये ड परिशिष्टामध्ये तीन मिळकती व इ परिशिष्टामध्ये १ मिळकत समाविष्ट आहे. (साक्षीदाराला निशाणी ४६ दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की निशाणी ४६ येथील सातबारा उताऱ्यामध्ये सर्वे नं. १५६ हिस्सा नं. १८ खोडून तेथे १० आकडा नमूद केला असून तेथे कोणाचेही आद्याक्षर अथवा संपूर्ण सही दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं. १२५ हिस्सा नं. ०, सर्वे नं. १२७ हिस्सा नं. १३ व सर्वे नं. १५६ हिस्सा नं. २२ या मिळकती ड परिशिष्टात समाविष्ट आहेत. ड परिशिष्टातील दावा मिळकतींचे सर्वे नंबर हे नवीन आहेत. (साक्षीदाराला निशाणी ५५ दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं. १२५ हिस्सा नं. ० च्या सातबारा उताऱ्यातील भोगवटादार सदरी नमूद असलेल्या सर्व लोकांना मी दाव्यामध्ये सामील केलेले नाही. (साक्षीदाराला निशाणी ५६ दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं. १२७ हिस्सा नं. १३ च्या सातबारा उताऱ्यातील भोगवटादार सदरी नमूद असलेल्या सर्व लोकांना मी दाव्यामध्ये सामील केलेले नाही. (साक्षीदाराला निशाणी ५७ दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं. १५६ हिस्सा नं. २२ च्या सातबारा उताऱ्यातील भोगवटादार सदरी नमूद असलेल्या सर्व लोकांना मी दाव्यामध्ये सामील केलेले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की इतर सहहिस्सेदारांचे पत्ते उपलब्ध नसल्यामुळे त्यांना दाव्यातून वगळण्यासाठी मी अर्ज दाखल केला होता. (साक्षीदाराला निशाणी ५८ दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं. ४० हिस्सा नं. ४४ च्या सातबारा उताऱ्यातील भोगवटादार सदरी नमूद असलेल्या सर्व लोकांना मी दाव्यामध्ये सामील केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की मला वाटपाची दाद लवकर मिळावी म्हणून मी इतर

सहहिस्सेदारांना दाव्यामध्ये जाणीवपुर्वक सामील केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा दावा दाखल केला आहे.

१०. हे म्हणणे खरे नाही की मी दाव्याच्या परिच्छेद क्र. २ मध्ये वादी व प्रतिवादीची जी वंशावळ दिली आहे ती खोटी आहे. मातोंड ग्रामपंचायत घर नं. ४२८ ई हा इमला मातोंड ग्रामपंचायत दप्तरी आकार नोंदवहीमध्ये सदाशिव विठ्ठल माळकर यांच्या नावे नोंद होता. मातोंड ग्रामपंचायत घर नं. ४२८ ई चा मालमत्ता कर मी भरतो. हे म्हणणे खरे आहे की मुळ मातोंड ग्रामपंचायत घर नं. ४२८ई चे अ ते फ असे भाग आहेत. घर बांधतेवेळी सन २००० मध्ये मूळ घराचे तोंडी वाटप केले होते. मला त्याची तारीख व महिना आठवत नाही. मुळ घराचे लिखीत वाटपपत्र झाले किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. वाटपपत्राची दुय्यम निबंधक कार्यालय वेंगुर्ला येथे नोंदणी झाली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मातोंड ग्रामपंचायत घर नं. ४२८अ, ब, क, ड, फ मी दाव्यात समाविष्ट केलेले नाही. (साक्षीदाराला त्याचे सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. ५ मधील मजकूर वाचून दाखविण्यात आला.) तो बरोबर आहे. (साक्षीदाराला त्याचे सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. ६ मधील मजकूर वाचून दाखविण्यात आला.) तो बरोबर आहे.

११. दि. २०/०२/२००९ रोजी माझे आजोबा सदाशिव विठ्ठल माळकर यांनी दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा मृत्यूपत्राद्वारे माझ्या नावे केला. माझ्या आजोबांचा दावा मिळकतीतील हिस्सा १/३ होता. मी मृत्यूपत्र पाहिलेले आहे. ते एकूण ६ पानांचे होते. पाने ही पाठपोठ नव्हती. दि. २०/०२/२००९ रोजी दुपारी १२.०० ते २.०० वाजण्याच्या दरम्यान मृत्यूपत्र नोंदणीकृत केले होते. सदाशिव विठ्ठल माळकर हे स्वतः दुय्यम निबंधक कार्यालयात रिक्षेने आले होते. त्यांच्या सोबत झिलू नारायण परब, आत्माराम न्हानू सावंत, चंद्रकांत वसंत परब, रविंद्र मनोहर मातोंडकर हे होते. हे म्हणणे खरे नाही की मृत्यूपत्राद्वारे सदाशिव विठ्ठल माळकर यांनी त्यांचा दावा मिळकतीतील हिस्सा मला दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की अभिलेखावर दाखल केलेले मृत्यूपत्र हे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की सदाशिव विठ्ठल माळकर यांची प्रकृती बरी नव्हती व ते मानसिक दृष्टया आजारी होते. हे म्हणणे खरे नाही की मातोंड ग्रामपंचायत घर नं. ४२८ई मध्ये सदाशिव विठ्ठल माळकर यांनी त्यांचा हिस्सा मला मृत्यूपत्राद्वारे दिला हे मी

खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की सदाशिव विठ्ठल माळकर यांची दृष्टी कमी होती.

१२. मी मृत्यूपत्र पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या मृत्यूपत्रावर साक्षीदारांच्या सह्या व अंगठे आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्या मृत्यूपत्रावर साक्षीदारांच्या अंगठ्याखाली दस्तुर म्हणून सही केलेली आहे. त्या मृत्यूपत्रावर दस्तुर म्हणून कोणी सही केले हे मला सांगता येणार नाही. दस्तुर म्हणून ज्यांनी सही केली त्यांचे नाव मृत्यूपत्रावर होते किंवा कसे हे मला माहीत नाही. मृत्यूपत्राच्या शेवटच्या पानावर सदाशिव विठ्ठल माळकर यांचा सही व अंगठा आहे. मृत्यूपत्राच्या प्रत्येक पानावर सदाशिव विठ्ठल माळकर यांचा सही व अंगठा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मृत्यूपत्राद्वारे मी जो दावा मिळकतीमध्ये हक्क उभारत आहे तो खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी प्रतिवादींविरुध्द खोटा दावा दाखल केला आहे. काही मिळकती या दाव्यामधून वगळण्याचा अर्ज अभिलेखावर मी दिला होता तो मंजूर अथवा नामंजूर झाला हे मला माहीत नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत.

सही/-
(के.के.पाटील)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.

दिनांक- २३/०६/२०२३.